II आ नो भद्र: क्रतवो: यन्तु विश्र्वत: II

ADARSH VIDYA PRASARAK SANSTHA'S

**ADARSH COLLEGE OF ARTS, COMMERCE & SCIENCE**

Near KBMC office, Kulgaon-Badlapur (E), Tal. Ambarnath Dist. Thane 421503

Permanently Affiliated to University of Mumbai & Recognized under 2(f) &12B of UGC Act, 1956

**NAAC Re-Accredited (3rd Cycle) B++ Grade with CGPA 2.89 (2024-2029)**

IMC-RBNQA -2019, ISO 9001-2015 Certified

www.adarshcollege.avpskulgaon.net, adarshcollege@rediffmail.com, 0251-2691819, 9309081149

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा

## महिला विकास कक्ष

### क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती -'मी अशी घडले' कथाकथन स्पर्धा

### अहवाल

आदर्श कला, वाणिज्य आणि आणि विज्ञान महाविद्यालयाच्या महिला विकास कक्ष आणि ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने थोर समाज सुधारक सावित्रीबाई फुले यांची जयंती दिनांक ३ जानेवारी २०२५ रोजी साजरी करण्यात आली.

महाराष्ट्र शासन आणि मुंबई विद्यापीठ यांच्या आदेशानुसार 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या विविध रंगी कार्यक्रमाचे आयोजन करणारा १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ हा पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. यातील तिसऱ्या दिवशी कथाकथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाची सुरुवात थोर समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनाने आणि दीप पूजनाने झाली. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. विलास तायडे, सहसंचालक, स्वयं सिद्धी व्यवस्थापन महाविद्यालय भिवंडी हे लाभलेले होते. त्यांनी आपली भारतीय संस्कृती आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्षा आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संगीता पांडे यांनी विद्यार्थ्यांना विविध ग्रंथांचा संदर्भ देऊन वाचनाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांच्या सभ्य, सुसंस्कृत होण्याचा आणि सर्वांगीण विकासाचा मार्ग म्हणजेच ग्रंथांचे वाचन होय आपल्या जीवनात आपण ग्रंथांचा आधार घेऊन यशस्वी होऊ शकतो. आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अनेक यशस्वी महिलांच्या यशोगाथा चरित्र रूपाने उपलब्ध आहेत, त्यातील एक लहानशा भागाच्या वाचनानेदेखील आपणास प्रेरणा मिळू शकते. म्हणून विद्यार्थ्यांनी ग्रंथ वाचन करावे तसेच 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले होय. त्यांच्या कार्याची जाणीव ठेऊन प्रत्येकाने वाचन, लेखन व वकृत्व विकसित करावे. असा मोलाचा सल्ला प्राचार्या डॉ. संगीता पांडे यांनी विद्यार्थ्यांना दिला.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्त्री चरित्रांचे वाचन करून एका महान यशस्वी महिलेची यशोगाथा आपल्या कथाकथनाद्वारे सादर केली. यामध्ये १५ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी पहिल्या भारतीय डॉक्टर आनंदिबाई जोशी, सावित्रीबाई फुले, लता मंगेशकर, किरण बेदी, गांधारी असे विविध स्त्री चरित्र सादर केलेत.

कार्यक्रमा च्या परीक्षणाची जबाबदारी प्रा. दक्षा हलकारे आणि कांचन कारखानिस यांनी पार पाडली तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. स्नेहल देशमुख यांनी केले. अशा पद्धतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचा कार्यक्रम ४० विद्यार्थी, सर्व शिक्षक , ग्रंथपाल व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थित उत्साहात पार पडला

ADARSH COLLEGE OF ARTS, COMMERCE & SCIENCE
Kulgaon Badlapur ESTD 1995

प्राचार्या

डॉ. संगीता पांडे

PRINCIPAL
Adarsh College of Arts, Commerce & Science
Kulgaon-Badlapur